स.फौ.के. नं. १२४/२०२५

नि. क्र. १३

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – शांताराम सिताराम शिंदे,

**वय** – ६५ वर्षे, **व्यवसाय** – निरंक,

**राहणार** – देवरुख, भायजेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>** –

**०१.** दिनांक ११/०६/२०२५ रोजी मी देवरुख येथे बाजारात आलो होतो त्यावेळी पोलीसांनी माझी एका कोऱ्या कागदावर सही घेतली होती. *(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविला). त्यावर अनुक्रमांक ०२ वर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही. (**<u>सही पुरत्या भागास निशाणी १४</u>** देणेत आली).*

**०२.** असे काही घडले नाही की, पोलीसांनी त्यावेळी छायाचित्रे घेतली होती. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली)*. त्यामध्ये मी हजर असल्याचे दिसुन येत आहे. बाकी छायाचित्रांमध्ये कोण व काय दिसुन येत आहे, हे मला माहिती नाही.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, मी, पोलीस कर्मचारी व दुसरा पंच रविंद्र गवंडी असे आम्ही सर्वजन देवरुख, वरचीआळी, सतीचामाळ येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपी आम्हाला त्याच्या पुढयात प्लॅस्टीकचा कॅन घेवुन दिसला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातून पोलीसांनी माझ्यासमक्ष दारु जप्त करुन त्यातील काही दारु रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतली व त्यावर माझ्या सहीचे लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, तसा पंचनामा पोलीसांनी माझ्यासमक्ष केला व तो वाचून, पाहून बरोबर असल्याचे खात्री करुनच मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला

वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.31 11:56:19 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

दिनांक –३०.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 30/12/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 30/12/2025 |
| Evidence uploaded on | : | 30/12/2025 |